# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### वेंगुर्ला (जि.सिंधुदुर्ग) येथे भारतीय पाकोळी पक्षाच्या वसाहतीला वातावरण बदलाचा धोका निर्माण झाल्याबाबत

**(१) ९४ (०७-०४-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेंगुर्ला (जि.सिंधुदुर्ग) येथे पृथ्वीवरील सर्वात जुन्या रॉक्स खडकांचा दीप समूह असलेल्या बेटावर भारतीय पाकोळी पक्षाच्या वसाहतीला वातावरण बदलाचा धोका निर्माण झाल्याचे मत शास्त्रज्ञाने व्यक्त केले असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय पाकोळी पक्षाच्या संवर्धनासाठी शासनाने लवकरात लवकर उपाययोजना कराव्यात, अशा प्रकारची मागणी पक्षी संवर्धन संघटनांनी वेळोवेळी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी भारतीय पाकोळी पक्षाच्या संवर्धनासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (०३-१०-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

भारतीय स्विफ्टलेट प्रजातीच्या संशोधन व अभ्यासांमध्ये त्यांच्या अधिवासाचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) भारतीय पाकोळी प्रजातिच्या संरक्षणार्थ क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• पोलीस, कोस्ट गार्ड, महसूल, बंदरे व वनविभागाच्या समावेश करुन जिल्हा पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरीय सागरी सुरक्षा समन्वय समितीची स्थापना करण्यात आली आहे.

• जिल्हा स्तरीय सागरी सुरक्षा समन्वय समितीमार्फत दर महिन्याला संयुक्त गस्त करण्यात येते.

• भारतीय पाकोळी प्रजातिच्या संरक्षण व संवर्धनाकरीता स्थानिक नागरिक व बोटचालक यांच्यात जनजागृती करण्यात येते.

• घरट्यांची शिकार थांबविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे महामंडळाच्या कर्ज मंजुरीसाठी असणाऱ्या अटी शिथिल करण्याबाबत

**(२) ७३९ (०८-०४-२०२५) श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे महामंडळ, मुंबई या संस्थेमार्फत मंजुरीनंतर कर्ज वितरणापूर्वी अर्जदाराने कार्यालयाकडील विभाग कार्यालय प्रमुखाचे वसुलीसाठी हमीपत्र सादर करावे व ज्यांच्या नावे मालमत्ता असेल असा धारक जामीनदार असावा अशा दोन जाचक अटी टाकल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त अटी शिथिल करण्याकरीता विविध संघटनांकडून शासनाकडे पत्रव्यवहार केला असून त्याअनुषंगाने तत्कालीन उपमुख्यमंत्री यांनी निर्देश दिले असल्याचे माहे, जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(३) असल्यास, उपरोक्त महामंडळामार्फत कर्ज मिळण्याकरीता घातलेल्या अटी व शर्थी शिथिल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (१७-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, मुंबई, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, मुंबई, संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई या महामंडळामार्फत कर्ज मिळण्याकरीता घातलेल्या अटी व शर्थी शिथिल करण्याबाबत मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक १२ ऑगस्ट, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता मिळाली असून यासंदर्भात विभागाद्वारे क्र. एलएएस-२०२३/ प्र.क्र.०४/ महामंडळे, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात संजय गांधी निराधार योजनेसाठी “आपले सरकार” पोर्टलवर हजारो अर्ज प्रलंबित असल्याबाबत

**(३) १०४० (१४-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे नोव्हेंबर,२०२४ मध्ये संजय गांधी निराधार योजनेसाठी "आपले सरकार" पोर्टलवर ५५७१ अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी एकूण ५ हजार २११ अर्ज प्रलंबित असल्याची माहिती सामान्य प्रशासन विभागाच्या अहवालातून माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील प्रशासकीय कामात गतिमानता आणि पारदर्शकता येण्याकरीता सन २०१५ पासून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची अंमलबजावणी सुरु करण्यात येऊनही "आपले सरकार" मध्ये संजय गांधी निराधार योजनेंतर्गत ३६० अर्जांना तर श्रावण बाळ योजनेंतर्गत ७५६ अर्जांनाच मंजुरी देण्यांत आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी प्रशासकीय कामात गतिमानता आणि पारदर्शकता मिळण्याच्यादृष्टीने तसेच राज्य शासनाच्या विविध पोर्टलवरील ऑनलाईन कामे लवकरात लवकर निकाली काढून मंजूर झालेल्या संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेंतर्गत लाभार्थ्यांना रक्कम मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.नरहरी झिरवाळ (१०-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय, "आपले सरकार" पोर्टलवर ऑनलाईनरित्या प्राप्त होणाऱ्या अर्जांची संख्या ही ऑफलाईनरित्या प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या संख्येपेक्षा अत्यल्प आहे. तालुकास्तरावर संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीमार्फत दर महिन्याला बैठक घेऊन प्राप्त ऑफलाईन/ऑनलाईन अर्जांवर किंवा प्रलंबित अर्जांवर मंजूर/नामंजूर करण्याची कार्यवाही केली जाते.

राज्य शासनातर्फे संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना माहे डिसेंबर, २०२४ पासून डी.बी.टी पोर्टलद्वारे प्रतिमाह रुपये १५००/- इतके अर्थसहाय्य थेट त्यांच्या खात्यात जमा करण्यात येत आहे. तसेच लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य त्याच महिन्याच्या पहिल्या आठवड्यात त्यांच्या खात्यावर जमा करण्यात येत आहेत. या योजनाअंतर्गत माहे ऑगस्ट, २०२५ अखेर एकूण ४३,०७,९६० इतक्या लाभार्थ्यांना डी.बी.टी पोर्टलद्वारे अर्थसहाय्य वाटप करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सारथी व महाज्योतीच्या संशोधक विद्यार्थ्यांना बाटीच्या धर्तीवर १०० टक्के शिष्यवृत्ती देण्याबाबत

**(४) ११७२ (१५-०४-२०२५) श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने दिनांक ३० ऑक्टोबर २०२३ रोजीच्या शासन आदेशानुसार बार्टी, सारथी व महाज्योती या तीनही संस्थांतील विद्यार्थ्यांना ५० टक्के शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतला असून बार्टीतील संशोधक

विद्यार्थ्यांनी १५ दिवस आंदोलन केल्यानंतर दिनांक २५ ऑगस्ट २०२४ रोजी शासनाने बार्टीतील विद्यार्थ्यांना १०० टक्के शिष्यवृत्ती देण्याची घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सारथी आणि महाज्योतीमधील पीएच.डी.चे संशोधक विद्यार्थी यांना फक्त ५० टक्केच शिष्यवृत्ती मिळणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव न करता सर्व संस्थांतील संशोधकांना समानरित्या १०० टक्के शिष्यवृत्ती देण्याची मागणी सारथी आणि महाज्योतीमधील विद्यार्थ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त मागणीसंदर्भात निर्णय घेण्याच्यादृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (१४-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) नियोजन विभागाच्या दिनांक ०४/१०/२०२४ रोजीच्या व इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या दिनांक ०९/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये बार्टीच्या धर्तीवर अनुक्रमे सारथी व महाज्योती या संस्थेतील संशोधक विद्यार्थ्यांना १०० टक्के दराने अधिछात्रवृत्तीचा लाभ देण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोपीनाथ मुंडे ऊस तोडणी मजुर महामंडळाच्या कामगारांना योजनांचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(५) १२४४ (१५-०४-२०२५) श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोपीनाथ मुंडे ऊसतोडणी मजुर महामंडळ हे उस तोडणी मजुर आणि शेतकऱ्यांमध्ये दुवा म्हणून कार्य करीत असून महामंडळाच्या माध्यमातून ज्या योजना राबविल्या जातात त्या योजनांचा काही लोकांनी स्वतःच्या लाभासाठी वापर केल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाच्या माध्यमातून ऊसतोड मजुरांच्या मुलांसाठी शिक्षणाची व्यवस्था व इतर योजनांची अंमलबजावणी होत नसल्याने महामंडळाच्या अंतर्गत काही शाळा सुरू करण्याच्या निर्णयानुसार किती शाळा सुरू झाल्या आहेत याबाबत ऊसतोड मजुरांना कोणतीही माहिती नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्रातील ऊसतोड मजुरांच्या मुकादमांनी ट्रॅक्टर मालकांचे पैसे बुडविल्याने राज्यभरात अनेक ठिकाणी आंदोलने झाली असून यासंदर्भात पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी महामंडळाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजनांचा ऊसतोड मजुरांना लाभ मिळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (१४-११-२०२५) :** (१) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार क्र.असंका-१११९/प्र.क्र.११०/विभाग काम.७, अ दिनांक १३ सप्टेबर २०१९ अन्वये राज्यातील ऊसतोड कामगारांसाठी विविध कल्याणकारी व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ देण्याकरीता गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. महामंडळाच्या योजनांचा काही लोकांनी स्वतःच्या लाभासाठी वापर केल्याची बाब महामंडळाच्या निदर्शनास आलेली नाही.
(२) शासन निर्णय दिनांक १५ जून २०२१ व शासन निर्णय दिनांक १० जानेवारी २०२४ अन्वये राज्यात स्थलांतरीत ऊसतोड कामगारांच्या मुलामुलींसाठी “संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना सुरू करण्यास व त्यानुसार मुलांसाठी ४१ व मुलींसाठी ४१ अशी एकूण ८२ (प्रत्येकी १०० क्षमतेची) वसतिगृह भाडेतत्वावरील इमारतींमध्ये सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यापैकी सद्य:स्थितीमध्ये ३७ वसतिगृहे सुरू आहे. त्यानुसार सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये मुलांची २२ व मुलींची १५ अशी एकूण ३७ शासकीय वसतिगृहे सुरु असून त्यामध्ये ११५० मुले व ८२६ मुली असे एकूण १९७६ मुले-मुली प्रवेशित आहेत. तसेच वसतिगृहाचे गृहपाल आणि सहायक आयुक्त यांच्या स्तरावरून त्याबाबतची जाणिव-जागृती करण्यात येते.
(३) सदर बाब गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाशी संबंधित नाही.
(४) संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह ता.जि.बीड व ता.शिरुर कासार जि.बीड येथील २ शासकीय वसतिगृहांसाठी शासकीय जमीन उपलब्ध झाल्याने प्रशासकीय मान्यतेनंतर सदर बांधकामास रुपये १९,९०,९८,९८४/- इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. शासन पत्र दिनांक १६ फेब्रुवारी २०२४ अन्वये पात्र ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांचे कुटूंबिय/वारस यांना रुपये ५.०० लक्ष प्रमाणे ९२ मयत ऊसतोड कामगारांच्या वारसदारांना तसेच १० ऊसतोड कामगारांच्या वैयक्तिक अंपगत्व आणि वैद्यकीय खर्चापोटी रुपये ४६६.५० लक्ष आर्थिक सहाय्य देण्यात आलेले असून, त्यापोटी इतका निधी संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण यांना वर्ग करण्यात आले आहे.
शासनाच्या दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ रोजी ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार, मुकादम त्यांचे झोपडी व बैलजोडी यांच्यासाठी सुरु करण्यात आलेल्या सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत ५४ मयत ऊसतोड कामगार, १ वैयक्तिक अपंगत्व, ५९ वैद्यकीय खर्चापोटी प्रस्ताव, बैलजोडी मृत्यू/अपंगत्व ४८ प्रस्ताव, झोपडीस आग लागणे ८ प्रस्ताव याकरीता रुपये ३ कोटी १६ लाख इतके सानुग्रह अनुदान देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिम जिल्ह्यातील ४५८ सिंचन विहिरीसाठी ५.७९ कोटी रुपयांचा निधी वितरीत करणेबाबत

**(६) २०२४ (१४-०४-२०२५) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हा जास्तीत जास्त सिंचनाखाली यावा यासाठी प्रशासनाकडून सिंचन विहीरीवर भर दिला जात असून जिल्ह्यात ४५८ नवीन सिंचन विहिरींची मागणी विभागीय आयुक्तांकडे करण्यात आली असून त्यासाठी ५.७९ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असल्याची बाब माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशिम जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रोजगार हमी योजनेतून विहिरी खोदण्यात आल्या असून या योजनेला गती देण्यासाठी तसेच ४५८ नवीन सिंचन विहीरीसाठी लागणारा ५.७९ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.भरत गोगावले (०३-११-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे.

वाशिम जिल्ह्यातील ८६७ नवीन सिंचन विहिरींकरीता रक्कम रुपये १०९५.२८ निधी मागणी प्रस्ताव वाशिम ज़िल्हामार्फत आयुक्त,महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे.

(२) सिंचन विहिरींकरीता बांधकामाच्या टप्प्यानुसार निधी उपलब्ध करून दिला जातो. सिंचन विहिरींचे बांधकाम २ वर्षाचे आत होणे अपेक्षित असते तद्नंतर आयुक्त,मनेरगा, नागपूर यांच्या स्तरावरून निधी मंजूर केला जातो.

केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला असून निधी वितरणाची बाब कार्यवाहीत आहे.

(३) विलंब झाला नाही.

---

## शेततळ्यातील संभाव्य धोके याबाबत जनजागृती करण्याबाबत

**(७) २२९६ (१०-०७-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (ता.नेवासा, जि.अहिल्यानगर) या गावामध्ये दिनांक १० मे, २०२५ रोजी दोन शालेय विद्यार्थी शेततळ्यात बुडून मृत्यूमुखी पडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विविध शेततळ्यांमध्ये वर्षानुवर्षे गाळ साचलेला असल्याने शालेय विद्यार्थ्यांचा पाण्यात बुडून मृत्यू होण्याचे प्रमाण वाढत असल्यामुळे ग्रामीण भागातील पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात दरवर्षी विविध जिल्ह्यांमध्ये शेततळयांमध्ये बुडून शालेय विद्यांच्या मृत्यूच्या अनेक घटना घडत असल्याने शेततळयांभोवती संरक्षण कठडे, सूचना फलक व कुंपण उभारणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेततळयातील संभाव्य धोके लक्षात घेता विद्यार्थ्यांना व पालकांना शेततळयांच्या धोक्यांविषयी शालेय शिक्षण व अन्य माध्यमांतून योग्य ती माहिती देऊन जागरूक होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दत्तात्रय भरणे (०९-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.
शेततळयामध्ये पडून जीवीतहानी सारख्या दुर्घटना घडू नये याची दक्षता घेण्याबाबत क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांनी शेतकऱ्यांना योग्य त्या सूचना देऊन जनजागृती करणेबाबत कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या स्तरावरुन सूचना देण्यात आल्या आहेत.
संचालक, मृदसंधारण यांचे दिनांक २८/०६/२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये शेततळयामध्ये अपघात/दुर्घटना घडु नये यासाठी क्षेत्रियस्तरावरुन खालील उपाययोजनांची प्रचार व प्रसिध्दी करणेबाबत सूचित केले आहे. :-
१) प्रत्येक शेततळयामध्ये त्यांच्या आकारमानानुसार जलतरण तलावावर वापरण्यात येणाऱ्या ट्यूब ठेवण्यात याव्यात.
२) शेततळयाच्या चोहोबाजूंनी गाठी मारलेले दोरखंड लावण्यात यावेत.
३) शेततळयामध्ये दोरखंडाची चौकोनी जाळी प्लॅस्टिक कागदाच्या उतारावर लावण्यात यावी.
४) शेततळयाच्या वरील चारही बाजूंनी लाईफ जॅकेट बसविण्यात यावेत.

वरीलप्रमाणे उपाययोजना केल्यास शेततळयामध्ये अपघात/दुर्घटना समयी बुडणाऱ्याचा जीव वाचविणे शक्य होऊ शकते.
तसेच संचालक, मृदसंधारण यांच्या दिनांक १९/०८/२०२४ च्या पत्रान्वये शेततळयापासून असलेल्या धोक्याबाबत समाजात जागरुकता निर्माण करण्याकरीता उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचे स्तरावरून समन्वयाने ग्रामपंचायत स्तर ग्रामसेवक व शिक्षक यांचे पथक तयार करून गाव पातळीवर जनजागृती मोहीम राबविण्याबाबत सुचित केले आहे. सदर जनजागृतीसाठी शाळेमधील विद्यार्थी तसेच तज्ञ मार्गदर्शकांच्या सहाय्याने पथनाट्य, प्रभात फेरी इ. माध्यमांचा वापर करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयांमध्ये फाळणीच्या वेळी निर्वासित झालेल्या सिंधी समाजाकरीता जमीनीचे पदे नियमित करण्याबाबत

**(८) २६३५ (१०-०७-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर, चंद्रपूर व इतर जिल्ह्यांमध्ये फाळणीनंतर स्थायिक झालेल्या सिंधी समाजाच्या मालकीच्या असलेल्या जमिनी नियमित करण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा जमिनी नियमित करताना सवलतीच्या दराने निवासी वापराच्या जागांवर व वाणिज्यिक प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या जागांवर किती टक्के अधिमुल्य शासन आकारणार आहे,

(३) असल्यास सिंधी समाजाच्या जमिनी नियमित करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२८-०८-२०२५) :** (१) (२) व (३) राज्यातील अधिसूचित क्षेत्रातील सिंधी विस्थापितांचे (उल्हासनगर, जिल्हा ठाणे, वगळून) निवासी व वाणिज्यिक जमीनींचे शर्तभंग नियमानुकूल व फ्री होल्ड करण्याबाबत महसूल व वन विभागाच्या दिनांक १५ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये "विशेष अभय योजना-२०२५" राबविण्यात येत आहे. सदर शासन निर्णयान्वये जमिनीचे शर्तभंग नियमानुकूलन करताना निवासी व वाणिज्यिक प्रयोजनासाठी अनुक्रमे २.५% व ५.०% इतके अधिमूल्य आकारण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नमो शेतकरी महासन्मान योजनेत ३ हजार रुपयांची वाढ करण्याबाबत

**(९) २६९४ (१०-०७-२०२५) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या 'प्रधानमंत्री किसान सन्मान योजना'च्या धर्तीवर राज्य शासनाने 'नमो शेतकरी महासन्मान योजना' सुरु केली असून, या योजनेंतर्गत राज्यातील पात्र शेतकऱ्यांना प्रतिवर्षी रुपये ६,०००/- आर्थिक सहाय्य देणार असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेतील सहाय्याची रक्कम रुपये ३००० ने वाढवून देण्याचे आश्वासन शासन स्तरावर देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र सरकारच्या पंतप्रधान किसान योजनेच्या धर्तीवर शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्यात रुपये ३,०००/- वाढ करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (०५-०९-२०२५) :** (१) "प्रधान मंत्री किसान सन्मान निधी योजनेत राज्य शासनाच्या अनुदानाची भर घालणारी "नमो शेतकरी महासन्मान निधी" योजना राबविण्यास सन २०२३-२४ पासून मान्यता देण्यात आली आहे.
(२) व (३) मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २०/०३/२०२५ रोजी झालेल्या बैठकीत "नमो शेतकरी महासन्मान निधी" योजनेतील लाभाची रक्कम वाढविण्यापेक्षा, कृषी क्षेत्राकरीता पायाभूत सुविधा निर्मितीवर भर देणारी नवीन योजना तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार वातावरणातील वाढत्या बदलांमुळे येत असलेल्या विविध आपत्तींना तोंड देण्यास राज्यातील शेतकऱ्यांना सक्षम बनविण्याकरीता, तसेच शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढवून त्याअंतर्गत कृषी क्षेत्रास आवश्यक असलेल्या विविध सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना, निकष व मापदंडानुसार, थेट लाभ हस्तांतरण तत्त्वावर सन २०२५-२६ पासून कृषी समृध्दी योजना राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नरवेल (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) येथील पूर्णा नदी पात्रातून अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याबाबत

**(१०) २८५६ (१०-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नरवेल (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) येथील पूर्णा नदी पात्रातून अवैधरित्या वाळू वाहतूक करण्यात येत असून वाळू माफियांवार कारवाई करण्यासाठी मा.लोकप्रतिनिधीनी यांनी दिनांक १० एप्रिल, २०२५ व दिनांक २७ एप्रिल,२०२५ रोजी महसूल मंत्री व जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे लेखी निवेदने सादर केली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पूर्णा नदी पात्रातून अवैधरित्या होत असलेली वाळू तस्करी रोखण्यासाठी तसेच संबंधित वाळू माफियांवर कारवाई करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१४-११-२०२५) :** (१) होय हे खरे आहे.
(२) मौजे नरवेल येथे होत असलेल्या अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई करुन ३९४ ब्रास रेतीसाठा जप्त करण्यात आला. सदर रेती साठा शासकीय कामाकरीता लिलावाव्दारे प्रति ब्रास रुपये ८००/- दराने परवानगी देवून रुपये ०३,१५,०००/- रक्कम शासन जमा करण्यात आली. तसेच सदर ठिकाणी नदीपात्रातून रेती उपसा करण्यासाठी वापरण्यात आलेल्या ८ केन्या,रॅम्प उध्वस्त करण्यात येवून २०० मीटरचे दोरखंड जप्त करण्यात आले आहे. नदीपात्रातून रेती घेवून जाण्या येण्याकरता वापरात असलेले रस्ते जे.सी.बी.व्दारे खोदून काढण्यात

आले आहेत. तसेच अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी दिवसा व रात्रीचे भरारी पथक स्थापन करण्यात आलेले असून, त्यानुषंगाने कारवाई करण्यात येत आहे.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## गोरेगाव (जि.हिंगोली) येथे नवीन अप्पर तहसिल कार्यालयात अधिकारी, कर्मचाऱ्यांची पदे भरण्यात आली नसल्याबाबत

**(११) २९४१ (१०-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव (ता.जि.हिंगोली) येथे सुरू करण्यात आलेल्या नवीन अप्पर तहसिल कार्यालयास सुमारे सहा वर्षांचा कालावधी उलटूनही सदर कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे अद्याप भरण्यात न आल्यामुळे सदर अप्पर तहसिल कार्यालयामध्ये आजपर्यंत कोणताही विभाग कार्यान्वित झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अप्पर तहसिल कार्यालय सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी लवकरात लवकर कार्यान्वित व्हावे यासाठी आवश्यक पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०७-११-२०२५) :** (१) व (२) विभागाच्या दिनांक १९/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये गोरेगाव अपर तहसिल कार्यालयाची निर्मिती करण्यात आली असून नियमित वेतनश्रेणीवर अपर तहसिलदार व लिपिक-टंकलेखक अशा २ पदांना मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १८/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर दोन्ही पदांवर अधिकारी/कर्मचारी कार्यरत असल्याचे कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यातील गोरेगाव येथे नवीन तालुका निर्मिती करण्याच्या मागणीबाबत

**(१२) २९४४ (१०-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्याची राजधानी म्हणून गोरेगाव ओळखले जात असून, या ठिकाणी नवीन तालुका निर्माण करण्याची मागणी स्थानिक नागरिक तसेच लोकप्रतिनिधींकडून सन २०११ पासून केली जात असून उक्त मागणीच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत गोरेगाव येथे स्वतंत्र तालुका निर्मितीचा निर्णय झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोरेगाव येथे नवीन तालुका निर्माण करण्याच्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१५-०९-२०२५) :** (१) व (२) अंशत: हे खरे आहे.
नवीन तालुका निर्मिती करणे ही एक मोठी आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया असल्याने नवीन तालुका निर्मिती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नव्हती. तथापि, प्रशासन लोकाभिमुख करून कामकाजात गतीमानता आणणे व तालुक्यांचे तहसिल कार्यालय बळकट करण्याच्या दृष्टीने विभागाच्या दिनांक १९/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मौजे गोरेगाव, तालुका सेनगाव, जिल्हा हिंगोली येथे अपर तहसिलदार कार्यालय निर्मिती करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) योजनेच्या धर्तीवर शासनाने नवीन योजना अंमलात आणल्याबाबत

**(१३) ३०१० (१०-०७-२०२५) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पिक विमा योजनेमुळे शासनावर पडणारा आर्थिक बोजा कमी करून त्यातील उर्वरित निधी शेतकऱ्यांच्या भांडवली गुंतवणुकीसाठी वापरण्याकरीता ‘नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा)’ योजनेच्या धर्तीवर शासन नव्या योजनेची अंमलबजावणी करणार असून यामध्ये पिकविमा भरपाईसाठी पीक कापणी प्रयोग (Crop Cutting Experiment) हा एकमेव निकष ठेवण्याचे नियोजन शासनस्तरावर सुरू असल्याचे मा.कृषी मंत्री महोदय यांनी दिनांक ८ एप्रिल,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात सदर योजनेच्या अनुषंगाने सध्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमध्ये १२ हजार गावांचा समावेश असून उर्वरित ३२ हजार गावांमधून अशा योजनांची मागणी प्राप्त झाल्याचेही मा.मंत्री महोदयांनी नमूद केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नव्या योजनेची अंमलबजावणी राज्यात नेमकी केव्हा सुरू होणार आहे आणि त्यासाठी काय निकष लागू असणार आहेत व यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (१०-०९-२०२५) :** (१) व (२) यापूर्वी अंमलात असलेल्या सर्वसमावेशक पीक विमा योजनेमध्ये बदल करुन सुधारीत पीक विमा योजना आणि नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या धर्तीवर कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर देणारी कृषी समृध्दी योजना राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. सुधारीत पीक विमा योजनेंतर्गत पीक कापणी प्रयोगाच्या आधारे संबंधित महसूल मंडळामध्ये उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत येणारी घट गृहीत धरुन त्यानुसार नुकसान

भरपाई देय राहील. कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर देणारी कृषी समृध्दी योजना संपूर्ण राज्यात राबविण्यात येणार आहे.
(३) सुधारीत पीक विमा योजना आणि कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर देणारी कृषी समृध्दी योजना या दोन्ही योजना सन २०२५-२६ पासून राबविण्यात येणार आहेत. सुधारीत पीक विमा योजनेंतर्गत खरीपासाठी २%, रब्बीसाठी १.५% व नगदी पीकांना ५% असा शेतकरी हिस्सा घेऊन उर्वरीत पीक विमा हप्ता केंद्र व राज्य शासनामार्फत देण्यात येईल. ही योजना पीक कापणी प्रयोगावर आधारीत राबविली जाईल.कृषी समृध्दी योजनेंतर्गत कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण करणे, उत्पादन खर्च कमी करणे, उत्पादकता वाढविणे, पीक विविधीकरण करणे, मूल्य साखळी बळकट करणे, तसेच हवामान अनुकूल आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याचा उद्देश आहे. ही योजना "मागणीवर आधारीत योजना", "जिल्हा स्तरावरील स्थानिक गुंतवणूक गरजांसाठी जिल्हा निधी" आणि "राज्यस्तरीय प्रकल्प, संशोधन आणि बळकटीकरण" या तीन भागात विभागण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात संपूर्ण गटामधील सर्व्हे नंबरची मोजणी करताना संपूर्ण गटाची फी भरावी लागणेबाबत

**(१४) ३०८२ (१०-०७-२०२५) श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जमीन मोजणी करताना एखाद्या गटातील विशिष्ट सर्वे नंबरची मोजणी करताना संपूर्ण गटासाठी निर्धारित असलेली मोजणी फी भरावी लागत असल्याने अल्पभूधारक किंवा सामान्य शेतकऱ्याला केवळ त्याच्या लहानशा प्लॉट किंवा जमिनीच्या तुकड्याची मोजणी करण्यासाठी पूर्ण गटासाठीची मोजणी फी भरावी लागत असल्यामुळे त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या हितासाठी मोजणी शुल्क फक्त संबंधित जमिनीच्या तुकड्यापुरते घेण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१०-११-२०२५) :** (१) व (२) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ८७, महाराष्ट्र जमीन महसूल (महसूली भूमापन व भूमापन क्रमांकाचे उपविभाग) अधिनियम, १९६९ चा नियम (३)२ व १३६ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सीमा व सीमाचिन्हे) अधिनियम, १९६९ चा नियम (१३)२ अन्वये मोजणी फीची आकारणी करण्याबाबत तरतूद आहे. धारण जमिनीच्या ७/१२ अधिकार अभिलेखात अर्जदार व सहहिस्सेदार यांची नावे समाविष्ट असतात. त्यामध्ये पोट हिस्सा मोजणी करताना अर्जदार यांचे संबंधित गट नंबरमधील त्यांच्या हिश्श्याचे क्षेत्र व नेमकी हद्द निश्चित करण्यासाठी संबंधित गट

नंबरमधील सर्व पोट हिश्श्यांची मोजणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे संपूर्ण गट/सर्व्हे क्रमांकासाठी विहित केलेले मोजणी शुल्क भरणे आवश्यक आहे.

राज्यामध्ये सन १९९२ पासून खरेदी हक्काने, वारसवाटणीने, हक्कसोडपत्राने किंवा हस्तांतरणान्वये नव्याने ७/१२ अधिकार अभिलेख तयार झाले असून पोटहिश्याचे क्षेत्र व हद्दीच्या नोंदी नकाशामध्ये घेण्यात आलेल्या नाहीत. याबाबत राज्यातील ग्रामीण भागातील शेत जमिनीचे पोटहिस्यांची मोजणी करून नकाशे व ७/१२ अधिकार अभिलेख अद्ययावत करण्याबाबत Digital India Land Records Modernisation Programe (DILRMP) प्रकल्पाअंतर्गत पोटहिस्सा मोजणी पथदर्शी प्रकल्पाकरीता एकूण १८ तालुक्यांमधील २०४७ गावांची निवड करण्यात आलेली आहे. त्यामध्ये एकूण ४,७७,००० पोटहिस्यांची मोजणी करणे, पोटहिस्सा नकाशे व ७/१२ अद्ययावत करण्याची कार्यवाही अंतर्भूत आहे. तसेच एकत्र कुटुंबातील धारण जमिनीच्या हिश्श्यांची मोजणी फी रुपये २००/- इतकी निश्चित करण्याबाबत शासन पत्र दिनांक २२/०५/२०२५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात नव्याने तयार होणाऱ्या सर्वसमावेशक व सुधारित वाळू धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१५) ३१६५ (१०-०७-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "ना नफा ना तोटा" या तत्वावर आधारित वाळू उत्खनन, वाहतूक, डेपो निर्मिती, स्वामित्वधन व शासकीय शुल्क यांचा समावेश करून वाळू विक्री दर निश्चित करण्यात आले असून त्यानुसार दिनांक १६ फेब्रुवारी, २०२४ रोजी सुधारित वाळू धोरण तयार करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील वाळू धोरण अस्तित्वात असूनही त्याच्या अंमलबजावणीत अडचणी निर्माण झाल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना शासनाने निर्धारित केलेल्या दरानुसार, म्हणजे रुपये ६०० प्रति ब्रास दराने वाळू उपलब्ध होत नसल्यामुळे नव्याने सर्वसमावेशक वाळू धोरण निश्चित करण्यासाठी नाशिक विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नव्याने तयार होणाऱ्या सर्वसमावेशक व सुधारित वाळू धोरणाची अंमलबजावणी राज्यात लागू करण्याकरीता शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०३-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) दिनांक ०८/०४/२०२५ च्या शासन निर्णयान्वये वाळू रेती धोरण २०२५ निर्गमित केले असून, त्याच्या अमंलबजावणीची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील महसूल विभागातील रिक्त पदाबाबत

**(१६) ३३६५ (१०-०७-२०२५) श्री.वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यात महसूल विभागात ४ उपजिल्हाधिकारी पदांसह "अ", "ब" व "क" वर्गातील एकूण १७ पदे रिक्त असल्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होत असून त्यांना विविध शासकीय सेवा व न्याय मिळण्यास विलंब होऊन तसेच कामेही खोळंबत असल्याचे माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला जिल्ह्यातील महसूल विभागात रिक्त असलेली पदे लवकरात लवकर भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१३-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

अकोला जिल्ह्यात महसूल विभागात गट-अ संवर्गाची उपजिल्हाधिकारी-४, गट-ब संवर्गाची नायब तहसिलदार-३, गट-क संवर्गाची लघुलेखक-२, उच्चश्रेणी लघुलेखक-१, निम्नश्रेणी लघुलेखक-२, मंडळ अधिकारी - २, महसूल सहायक - १७, वाहनचालक -४ अशी एकूण ३५ पदे रिक्त आहेत.
(२) व (३) गट-अ व गट-ब संवर्गाची ८ पदे भरण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

गट-क संवर्गातील लघुटंकलेखकाचे २ पदे रिक्त असून १ पद भरण्याच्या अनुषंगाने मागणीपत्र सादर करण्यात आले आहे तसेच उर्वरित १ पद पदोन्नतीने भरावयाचे असून पात्र कर्मचारी उपलब्ध नसल्याने सदर पद रिक्त आहे.

तसेच निम्नश्रेणी लघुलेखक संवर्गातील मंजूर ६ पदांपैकी ४ पदे भरलेली असून २ पदे रिक्त आहेत.

मंडळ अधिकारी संवर्गातील २ रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

महसूल सहाय्यक संवर्गातील १७ पदे पदोन्नतीने भरण्यासाठी पात्र कर्मचारी उपलब्ध नसल्याने सदर पदे रिक्त आहेत.

गट-ड संवर्गातील पदे सरळसेवा भरतीमधून वगळण्यात आल्याने वाहन चालक संवर्गाची ४ पदे रिक्त आहेत.

---

## जळगाव जिल्ह्यातील प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचन योजनेंतर्गत प्रलंबित असलेले अनुदान उपलब्ध करून देणेबाबत

**(१७) ३९८५ (१७-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचन योजनेंतर्गत मागील दोन वर्षांपासून अनुदान प्राप्त न झाल्यामुळे अनेक शेतकरी लाभापासून वंचित असल्याची बाब माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सूक्ष्म सिंचन योजनेसाठी अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (०९-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०२३-२४ मध्ये जळगाव जिल्ह्यातील ३६,४५६ लाभार्थ्यांना अनुदानाकरीता मंजूरी देण्यात आलेली होती. सदर लाभार्थ्यांपैकी २७,१४८ संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर रक्कम रुपये २०८.३७ कोटी अनुदान माहे मार्च, २०२५ अखेर जमा करण्यात आले असून ९,३०८ लाभार्थी प्रलंबित होते. तद्नंतर केंद्र शासनाकडून माहे मे, २०२५ मध्ये ९,२४७ लाभार्थ्यांकरीता रुपये ५५.३५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. केंद्र शासनाकडून पुढील हप्ता प्राप्त होताच उर्वरित निधी वितरीत करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजा पेठ, अहमदपूर (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील माजी सैनिक यांच्या जमिनीचा सातबारा त्यांच्या नावे करणेबाबत

**(१८) ४०१६ (१०-०७-२०२५) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा पेठ, अहमदपूर (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील माजी सैनिक सैफुल्ला खॉ मिठेखॉ यांना दिनांक ३० जुलै, १९६६ रोजी जिल्हाधिकारी वर्धा यांच्या आदेशान्वये जमीन प्रदान करण्यात आली होती, सदर जमिनीचा सातबारा उतारा अद्याप त्यांच्या नावावर न झाल्याची बाब दिनांक १९ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सैफुल्ला खॉ मिठेखॉ यांच्या ताब्यातील सर्वे क्र. ५१ ही जमीन वापरत असतानाही, जवळपास ५८ वर्षांचा कालावधी उलटूनदेखील सदर जमिनीचा सातबारा त्यांच्या नावावर नसल्याबाबतचे निवेदन मा.लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्र्यांकडेही सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२८-०८-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजा आर्वी येथील नगरपरिषद हद्दीतील भूखंडावर बांधकाम परवानगी न देण्याबाबत

**(१९) ४०५८ (१७-०७-२०२५) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा आर्वी (जि.वर्धा) येथील नगरपरिषद हद्दीतील नझुल शिट क्र. १, भूखंड क्र. १६/४, क्षेत्रफळ ९४७.६० चौ.मी. या भूखंडावर बांधकाम परवानगी न देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी विभागीय आयुक्त, नागपूर यांना दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी निवेदनाद्वारे सादर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित भूखंड हा आर्ट ॲण्ड कॉमर्स महाविद्यालयासाठी राखीव असूनही त्याठिकाणी व्यावसायिक गाळे बांधून व्यापाऱ्यांना विक्री करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याची बाब माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाविद्यालयासाठी राखीव असलेल्या भूखंडावर व्यावसायिक वापराच्या उद्देशाने देण्यात आलेली बांधकाम परवानगी रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२६-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
सदर भूखंड आर्ट ॲण्ड कॉमर्स महाविद्यालयासाठी राखीव करण्यात आलेला नसून सदर जागा नझूल जमीन असून सचिव, तहसिल आर्वी सहकारी संघ आर्वी यांना भाडेपट्टयाने देण्यात आली होती.
(३) उपविभागीय अधिकारी, आर्वी यांच्या दिनांक २७ फेब्रुवारी,२०२५ रोजीच्या आदेशांन्वये नझुल शिट क्र.१, भूखंड क्र.१६/४, क्षेत्रफळ ९४७.६० चौ.मी. या भूखंडावर वाणिज्य गाळयाचे बांधकाम करण्यासाठी देण्यात आलेली बांधकाम परवानगी उपविभागीय अधिकारी, आर्वी यांच्या दिनांक १६ मे,२०२५ रोजीच्या आदेशान्वये रद्द करून या आदेशान्वये केवळ वापरात बदल करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

वि.प. २० (१७)

## नागपूर जिल्ह्यातील तलावांचे गाळ काढणे आणि अतिक्रमण निष्कासीत करण्याच्या प्रक्रियेस गती मिळण्याबाबत

**(२०) ४४२८ (१७-०७-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील तलावांमधून गाळ काढणे, अतिक्रमण हटविणे, स्थानिक मच्छीमारांचे उत्पादन वाढविण्यासाठी उच्च दर्जाचे मत्स्य उपलब्ध करुन देणे तसेच पावसाळयापूर्वी गाळ हटविण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश मा.मत्स्यव्यवसाय मंत्री महोदयांनी प्रशासनास दिल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय संदर्भातील कामांचा अलीकडेच घेतलेल्या आढावानुसार दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे (११-११-२०२५) :** (१) होय

(२) मा.मंत्री (मत्स्य) महोदयांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालय येथे दिनांक ०७/०२/२०२५ रोजीच्या बैठकीत मा.मंत्री (मत्स्यव्यवसाय) यांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने त्यानुसार क्षेत्रिय कार्यालय नागपूर यांनी जिल्ह्यातील मत्स्यपालन सहकारी संस्थांकडून ६ पाटबंधारे व ११ जिल्हा परिषद विभागाचे असे एकूण १७ तलावांचे गाळ काढणे बाबतचे प्रस्ताव सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर कार्यालयाकडून तलावांची मालकी असलेल्या कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग उत्तर/दक्षिण नागपूर तसेच जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांना कार्यवाहीस्तव सादर करण्यात आलेले आहेत.

तसेच अतिक्रमण असल्यास तलावक्षेत्राबाहेरील अतिक्रमण काढण्याबाबत संबंधित विभागास कळविले आहे. सद्य:स्थितीत नागपूर जिल्ह्यातील ४४ जिल्हा परिषद मालकीच्या तलावांचे गाळ काढण्याचे काम गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत जलसंधारण अधिकारी, नागपूर यांचेकडून हाती घेण्यात आलेले आहे.

मच्छीमारांचे उत्पादन वाढविण्यासाठी उच्च दर्जाचे मत्स्यबीज उपलब्ध करणेच्या अनुषंगाने सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर कार्यालयाच्या स्तरावरुन कार्यवाही सुरु असून जिल्हा खनिकर्म योजनेंतर्गत पेंच व खिंडसी जलाशयात शाश्वत मासेमारीद्वारे स्थानिक मच्छीमारांना रोजगार उपलब्ध होण्यास्तव मत्स्यबीज संचयन कार्यक्रम प्रस्तावित करण्यात आलेला असून सदर योजनेसाठी सन २०२५-२६ करीता रुपये ५४.२९५ लक्ष निधी खर्च करण्यास या कार्यालयाकडून तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

तसेच नागपूर जिल्ह्यातील पेंच नदीमध्ये, स्थानिक मच्छीमारांना रोजगार उपलब्ध होणेस्तव प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत रिव्हररांचींग कार्यक्रमांतर्गत, पेंच नदीतील प्रजननक्षम मासोळी पासून उच्च प्रतीचे मत्स्यबीज तयार करुन ते परत पेंच नदी पात्रात रिव्हररांचिंग कार्यक्रमाअंतर्गत संचयित करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.